# भारतीय जनता पक्ष

केंद्रिय कार्यालय

11,अशोक रोड, नवी दिल्ली-110001

फोनः 23005700, फॅक्सः 23005787


दिः 03 फेब्रुवारी, 2014

## भाजपाच्या राष्ट्रीय प्रवक्त्या श्रीमती निर्मला सीतारमन यांच्या द्वारे जारी केलेले प्रेस वक्तव्य

कॉग्रेस पक्ष हा श्री नरेंद्र मोदी, गुजरात भाजपा आणि गुजरात सरकारला निशाणा बनविण्याची कोणतीही संधी सोडत नाही. यावेळेला कोणत्याही तयारीशिवाय कॉग्रेसने एक असा मुद्दा उठवला आहे, जो केंव्हाच संपला आहे, यामुळे कॉग्रेसची स्वतःची विफलता दिसून येते.

कमाई किंवा खर्चाच्या आधारावर गरिबीचे स्तर ठरवणे- पूर्ण पणे केंद्र सरकारचे काम आहे. इथपर्यंत की जर केंद्र सरकार द्वारे संशोधित दर दिली जातात, तरीसुद्धा राज्यसरकारला संशोधित मानक स्वीकारण्यास तोपर्यंत अधिकार नाही जोपर्यंत केंद्रातील संबंधीत विभाग यासंदर्भात कोणतेही निर्देश जारी करत नाही. शहरी/ग्रामीण साठी प्रती व्यक्ती कमाई अनुक्रमे 501/324 रुपये महिना दाखविणारे आकडे सरकारकडून 2004 मध्ये ठरविण्यात आलेल्या मानकांनुसार आहेत, भारत सरकार कडून ठरविण्यात आलेल्या मानकांनुसार ही माहिती गुजरातच्या खाद्य आणि नागरिक आपूर्ती विभागाने दिली आहे. हे मानक गुजरात सरकारने ठरविले नाही आहेत. फक्त कमाईच नाही तर अन्य संपत्ती उदा. टेलीविजन, रेडियो अथवा सायकल च्या आधारे गरिबी रेषेच्या खाली असलेल्या लोकांचा ठावठिकाणा घेतला जाऊ शकतो. याला परिसंपत्ती आधारित मानक कार्य पद्दति बोलले जाते.

केंद्र सरकारच्या परिसंपत्ती आधारित मानकाच्या आधारावर गुजरात मध्ये फक्त 21 लाख परिवार गरिबी रेषेच्या खाली येतात. तथापि या आकड्यात ते सर्व लोक शामिल नाही आहेत ज्यांना या श्रेणीत यायला पाहिजे. गुजरात सरकारने या मानकाला पुढे घेऊन जाताना आपल्या खर्चावर गरिबी रेषेच्या खाली आणखी 11 लाख परिवारांना आणले. दूस-या शब्दात 11 लाख परिवारांना गुजरात सरकारकडून पूर्ण साहाय्य करण्यात येऊन त्यांना धान्य दिले जाते. म्हणजेच एकुण 32 लाख परिवार आहेत ज्यांमधून फक्त 21 लाख परिवाराला लाभ मिळत आहे. गरिबी निर्मुलन कार्यक्रमाला प्रभावकारी रित्या लागू केले म्हणून सर्वोच्च न्यायालयाने या कार्याची स्तुती केली होती.

2004 नंतर गुजरात सरकार ने केंद्र सरकारला अनेक विनंती केल्या ज्यात गरिबी रेषेच्या खाली असलेल्या लोकांच्या मानकात त्वरित संशोधन करण्याची गरज सांगितली गेली होती. मात्र या पत्रांकडे कोणी लक्ष दिले नाही. या मानकात बदल केल्याशिवाय समितीवर समिती बनविण्यात आली आणि आता 10 वर्षे झाली. जर श्री नरेंद्र मोदी योजना आयोगाचे लक्ष केंद्रित करतील तर ही सुद्दा 10 वर्ष जुनी विनंती आहे ज्याकडे दुर्लक्ष करण्यात आले आहे.

कॉग्रेस पक्षाने जेवढ्या वाईट प्रकारे गुजरातच्या मुख्यमंत्र्यावर टीका करण्यास प्रारंभ केला, त्यांनी विचार केला पाहिजे की, कडक टीका तर त्यांची झाली पाहिजे. भाजपा ला अपेक्षा आहे की गुजरात सरकार त्या सर्व तारखांना समोर ठेवेल जेव्हा-जेव्हा त्यांनी या मानकांच्या समिक्षेसाठी केंद्र सरकारकडे स्मरण पत्र पाठविले होते.

बदनाम करण्याचा अधिकार आणि खोट्याचा अधिकार

आम आदमी पक्ष एका जागेवर वाईट नजरेने एकटक पाहत आहे. हा एक असा अधिकार वाटतो जो संविधानाने या देशात कोणालाही दिलेला नाही. त्यांनी वैकल्पिक राजनीति देण्याच्या नावाखाली स्वतःला बदनाम करणे आणि आपल्या विरोधींवर चुकीचे आरोप लावण्याचा अधिकार दिला आहे. विश्वसनीयता, ओळख आणि त्वरित लक्ष केंद्रित करण्याच्या हव्यासापोटी निराश होऊन ते भाजपाच्या काही प्रमुख नेत्यांची नावे घेण्यासाठी सुद्धा मागे-पुढे पाहत नाही. हे पूर्णतः निंदनीय आहे की, एएपीचे नेते भाजपाच्या ज्या नेत्यांबद्दल बोलत आहेत, त्यांच्या विरुद्ध पुरेसे पुराव्यांसह ते आपला आरोप स्पष्ट करु शकत नाहीत. यातून असे समजते की, हे बदनाम करणारे, खोटे आणि नुकसान पोचविणारे आरोप आहेत.

एएपी ला त्या भ्रष्ट कॉग्रेसचा सहारा घेताना जरासुद्धा संकोच वाटला नाही, ज्याला त्यांनी चोर म्हटले होते, आणि दिल्लीच्या मुख्यमंत्र्यांनी आपल्या मुलांची शपथ घेऊन सांगितले होते की, ते कॉग्रेसचे समर्थन घेऊन सरकार बनवणार नाही मात्र त्यांनी किती मोठी पलटी मारली.

1. भ्रष्ट कॉग्रेसच्या मदतीमुळे ते सत्तेत आहेत.

2. भ्रष्ट लोकांच्या यादीत शीला दीक्षित यांचे नाव घालण्याची हिंमत होत नाही.

3. आतापर्यंत एएपी कॉग्रेस आणि त्यांच्या नेतृत्त्वाच्या विरोधात कोणती कारवाई केली नाही. ते लोकांकडून पुरावे मागत आहेत.

4. दिल्लीत वीज महाग होत आहे. एएपी च्या वचनांचे काय झाले?

5. दिल्ली मध्ये दूध महाग झाले आहे. कॉग्रेस आणि एएपी ला उत्तर द्यावे लागेल की, दिल्लीत असे का होत आहे.

6. युगांडा येथील नागरिकांच्या घरावर धावून येणा-या एएपीला कुठे आहे? पूर्वोत्तर मध्ये आमच्या बंधूंचे समर्थन करताना ते कुठे गायब झाले आहेत?

भाजपा एएपी ला आठवण करुन देऊ इच्छिते की, त्यांना दिल्ली येथील शासन व्यवस्थेवर लक्ष दिले पाहिजे. एका फॅन्सी यादी सोबत पत्रकार परिषद करणे आणि कोणत्याही पुराव्याशिवाय खोटे दावे करण्याने सुशासन होऊ शकत नाही. या नव्या सरकारच्या येण्याने दिल्लीचे लोकांना असहाय वाटत आहे.

श्री अरुण कुमार जैन

कार्यालय सचिव